अंतिम पूररेषा आखणी होईपर्यंतच्या कालावधीसाठी अंतरिम पूररेषा (Interim blue lines) आखणी करणे व या पूररेषेच्या मर्यादेत बांधकामाचे नियमन करण्याच्या दृष्टिने मार्गदर्शक सूचना प्रसृत करणे.

<u>महाराष्ट्र शासन</u>

जलसंपदा विभाग,

शासन परिपत्रक क्र पूरनि-२०१८/(प्र.क्र.१८२/२०१८)/सिं.व्य.(महसूल)

मंत्रालय, मुंबई ४०००३२,

दिनांक: १० जुलै, २०१९

<u>वाचावे</u> :- १) शासन परिपत्रक क्र.: एफडीडब्लू -१०८९/२४३/८९/ सिं.व्य.(कामे), दि. २.०९.१९८९ व दि.२१.९.१९८९

२) शासन परिपत्रक क्र. पुरनि-२०१८/(प्र.क्र.१८२/२०१८)/सिं.व्य.(महसूल) दि. ३ मे २०१८

<u>प्रस्तावना :-</u>

पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र एफडीडब्लु १०८९/२४३/८९/ सिंव्य (कामे) दि.२.९.१९८९, दि.२१.९.१९८९ व शासन परिपत्रक क्र. पुरनि-२०१८/(प्र.क्र.१८२/२०१८)/सिं.व्य.(महसूल)दि. ३ मे, २०१८ अन्वये पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आत बांधकाम नियमन करण्याच्या दृष्टिने पूरेषेची आखणी करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

पूररेषा आखणी पूर्ण न झाल्याने, नदीच्या निषिध्द क्षेत्रात (Prohibitive Zone) आणि नियंत्रित क्षेत्रात (Restrictive Zone) या पूरप्रवण क्षेत्रात बांधकाम परवानगी दिली जाते वा अतिक्रमणे होतात. यामुळे पर्यावरणास धोका निर्माण होत आहे.

वनशक्ती पब्लिक ट्रस्ट विरुध्द भारत सरकार व इतर, जनहित याचिका क्र. १४/२०१४ मधील मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील सुनावणीत अंतिम पूररेषा निश्चित होईपर्यंतच्या अंतरिम कालावधीसाठी धोरण निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे यांनी याचिका क्र. २५/२०१४ च्या दिनांक २७/५/२०१५ च्या आदेशात देखील अंतिम पूररेषा निश्चित होईपर्यत दरम्यान कालावधीसाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून अंतरिम पूररेषा आखणी करणेबाबत निर्देश दिले होते. उपरोक्त निर्देशामधील तरतुदीनुसार अंतिम पूररेषा पूर्ण होण्यापूर्वी अंतरिम निळी रेषा पासून काही किमान अंतरापर्यत महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, नगरपरिषदा यांनी ना-बांधकाम क्षेत्र समजण्यात यावे, याचे देखील अनुपालन करणे आवश्यक आहे .

अशा प्रकारच्या अंतरिम निळया रेषा, (Interim blue lines) प्राधान्यक्रमाच्या नदयांवरील भागात अथवा इतर नद्यांवर, अंतिम पूररेषा आखणी होईपर्यंतच्या / दरम्यानच्या कालावधीत आखणी करणे क्रमप्राप्त आहे. यामुळे बांधकाम परवानगी देणे / अतिक्रमण होणे या बाबी टाळता येतील. याबाबत अधिक स्पष्टता व अचूकता आणण्याच्या दृष्टीने संदर्भ १ व २ येथील परिपत्रकाला पूरक अशा मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

परिपत्रक :-

१) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधीकरण, पुणे रिट याचिका क्र. २५/२०१४ मधील नमूद केलेल्या प्राधान्य क्रमातील नदया व इतर उर्वरित नदया अथवा त्याचा भाग याकरिता हे धोरण लागू राहिल.

२) जलसंपदा विभागाने अंतरिम कालावधीसाठी आखणी केलेल्या अंतरिम पूररेषा व अंतिमत: आखणी केलेल्या पुररेषा मधील बांधकामासंदर्भात शासन परिपत्रक क्र.FDW/१०८९/२४३/८९/सिंव्य (कामे), व दि.२/९/१९८९, दि. २१/९/१९८९ तसेच शासन परिपत्रक क्र. पूरनि-२०१८/(१८२/२०१८)/सिंव्य (महसूल), मंत्रालय,मुंबई दि. ३/५/२०१८ मधील तरतूदी लागू असतील.

३) ज्या नदीच्या भागातील अंतिम पूररेषा आखणी पूर्ण झालेली नाही, त्या भागात अंतिम पूररेषा आखणी होईपर्यत दरम्यानचे कालावधीसाठी अंतरिम निळी पूररेषा (Tentetive blue line) आखणी करण्यात यावी. (Tentetive Blue line) ही त्या भागात आजपर्यंत निरीक्षणात आलेल्या महत्तम पूर पातळी (Observed flood level) प्रमाणे असावी. याबाबत क्षेत्रिय स्तरावर असलेले अभिलेखे व तेथील रहिवाशी यांच्याशी संवाद साधून ही पातळी निश्चित करावी.

४) अशा प्रकारे निश्चित केलेल्या पूर पातळी नुसार येणारे भौगोलिक स्थान नकाशावर दर्शविण्यात यावे. या भौगोलिक स्थानकांना जोडणाऱ्या पूररेषेचा (Blue lines) नकाशा तयार करण्यात यावा.

५) अंतरिम पूररेषा नकाशे मान्यतेचे अधिकार फक्त संबंधित मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांनाच असतील. संबंधित विभागांना या बाबत अवगत करणे व मान्यता प्राप्त नकाशे राज्य शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची असेल.

६) या अंतरिम निळी पुररेषा (Interim blue lines) च्या पुढे ५० मी. अंतरापर्यंतचे क्षेत्र ना - बांधकाम क्षेत्र (Non Development Zone) असेल. तसे त्याचे अनुपालन करण्यासंदर्भातील नियंत्रक आदेश (Regulatory Orders) नगर विकास विभाग स्वतंत्रपणे निर्गमित करेल.

७) अंतरिम निळी पूररेषा च्या निषिध्द भागात (Prohibitive Zone) मध्ये दरम्यानच्या कालावधीत काही अपवादात्मक परिस्थितीमुळे बांधकाम करणेबाबत काही निर्णय घ्यावयाचा असल्यास त्या संदर्भात संबधित मुख्य अभियंता, जलसंपदा यांचे पूर्व अभिप्राय घेणे अनिवार्य असेल. तथापि, अशा निर्णयाला संबंधीत नियोजन प्राधीकरण, यंत्रणा/ विभाग जबाबदार असेल.

८) सदर अंतरिम पूररेषा प्रसिद्ध झाल्यानंतर १२ महिन्याच्या कालावधीत अंतिम (Final) पूररेषा निश्चित करावी .अंतिम पूररेषा आखणी झाल्यावर अंतरिम (Interim blue lines) पूररेषा आपोआप रद्दबाबत होतील.

९) दरम्यानच्या कालावधीसाठीची अंतरिम पूररेषा व तद्‌नंतर अंतिम केलेली निळी व लाल पूररेषा याच्या प्रतिबंधीत व नियंत्रक भागात पूर्वीची / अस्तित्वातील बांधकामे असतात. ती पूर्णत: स्थलांतरीत करणे/ त्यांचे पुनवर्सन करणे सहज शक्य नाही. या भागातील पूररेषा निश्चिती करतांना त्यांचा अंतर्भाव करुनच तांत्रिक परिगणना व

पूरपातळी निश्चित केलेली असते. त्याचप्रमाणे ह्या बांधकामाची काळाच्या ओघात पुनर्रचना व पुनर्बांधणी करणे आवश्यक ठरते. पण त्याचवेळी नवीन बांधकामांना देखील प्रतिबंध आहे. यावर पुढील प्रमाणे स्पष्टता आणण्यात येत आहे.

अ) नवीन बांधकामे करण्याबाबत यापूर्वीचा शासन निर्णय दि.३/५/२०१८ मधील तरतुदी तशाच लागू राहतील.

ब) अस्तित्वातील/पूर्वीच्या बांधकामांची बांधकाम क्षेत्रात/तळ मजल्याच्या जोता क्षेत्रात वाढ न करता देखभाल/ दुरुस्ती/ नुतनीकरणाची कामे करता येतील.

क) अस्तित्वातील /पूर्वीच्या बांधकामांची पुनर्रचना व पुनर्बांधणी करावयाची असल्यास या क्षेत्रातील बांधकामांच्या तळमजल्याच्या जोत्याची पातळी लाल पूररेषा पातळीच्या वर सुरक्षित उंचीपर्यंत असावी की ज्यामुळे पूरपातळी जास्त वाढण्यापूर्वी तेथील नागरिकांना सुरक्षितस्थळी सहजपणे जाता येईल. तसेच या क्षेत्रामध्ये येणारा संभाव्य पूर व तसेच पुरामुळे होणारी जिवित हानी व मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी ह्या क्षेत्रातील लोकांना, जनावरांना व वस्तुंना अल्पावधीची पूरसूचना मिळताच हे क्षेत्र तातडीने सोडून सुरक्षित स्थळी जाणे शक्य होईल.

१०) सदर शासन परिपत्रक नगरविकास विभाग, पर्यावरण विभाग व उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे .

सदर शासन परिपत्रक संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २०१९०७१०११५११५३०२७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.07.10 12:04:46 +05'30'

(अ. अ. कपोले)
उप सचिव (सिंव्य)

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,
३. मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई,
४. मा.सभापती / उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मंबई,
५. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई, यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
६. मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई, यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
७. मा. मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१०. महालेखापाल १ / २ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
११.प्रधान सचिव. (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई,

१२.प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३.प्रधान सचिव (नगरविकास) नवी-१ यांचे स्वीय सहायक, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४.प्रधान सचिव (नगरविकास) नवी-२ यांचे स्वीय सहायक, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६.सचिव (प्रकल्प समन्वय) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७.सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१९.सर्व विभागीय आयुक्त,
२०. सर्व जिल्हाधिकारी .
२१.सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,
२१. संचालक, नगररचनाकार, पुणे, यांना विनंती आहे की, सर्व महानगरपालिका, नगर पालिका, नगर परिषद, सर्व प्राधिकारणे, सिडको, म्हाडा, हडको यांना आपल्या स्तरावर कळविण्यात यावे.
२२.सर्व मुख्य अभियंता/ मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, जलसंपदा विभाग,
२३.जलसंपदा विभागातील सर्व सहसचिव व उपसचिव, मंत्रालय, मुंबई,
२४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
२५.सर्व अधीक्षक अभियंता /अधीक्षक अभियंता व प्रशासक, जलसंपदा विभाग,
२६.सिं.व्य. (महसूल) कार्यासन, संग्रहार्थ,